# विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

१७ डॉ. आंबेडकर मार्ग, कॅम्प पुणे ४११००१

दूरध्वनी क्रमांक ०२० - २६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२० -२६१२२२१७

वेबसाईट : www.dydepune.com ईमेल आय डी :- dydpune@gmail.com

जा.क्रं. उमाशि-१/पुवि/ऑन/प्रवेश/२०१५-१६

दिनांक :- 9/6/15

प्रति,

१) श्री हारुन अत्तार, शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, पुणे

२) श्रीमती जामदार व्ही. जे., शिक्षणाधिकारी (नि.शिं.) जिल्हा परिषद, पुणे

३) श्री बजरंग आवारी, उपशिक्षणाधिकारी, (माध्य) जिल्हा परिषद, पुणे

४) श्री बी. एस. कारेकर, उपशिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, पुणे

विषय :- इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१५-१६
अल्पसंख्यांक, इनहाऊस व व्यवस्थापन कोटयातील प्रवेशाबाबत.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रं. प्रवेश २०१४/प्र.क्र.११२/एसडी-२ दिनांक १४/५/२०१५
२) या कार्यालयाचे पत्र समक्रमांक ८७२८ दिनांक १४/५/२०१५
३) इ. ११ वी केंद्रियश प्रवेश समितीची बैठक क्रमांक ८/६/२०१५

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सन २०१५-१६ मधील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचे इ. ११ वी चे प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. माध्यमिक शाळा संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयांना इन हाऊस कोटयातून २० टक्के प्रवेश, संस्था व्यवस्थापनास ५ टक्के प्रवेश, अल्पसंख्यांक संस्थांसाठी ५० टक्के प्रवेश करण्याबाबत अधिकार आहेत.

याबाबत संदर्भीय शासन पत्र दिनांक १४/५/२०१५ अन्वये कळविल्यानुसार अल्पसंख्यांक संस्था संचलित उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवावी व शासनाच्या प्रचलित नियमांनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दयावा आणि याबाबत या कार्यालयाकडे कोणतीही तक्रार येणार नाही असेही संबंधित सर्व अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयांना संदर्भीय क्रमांक २ दिनांक १४/५/२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

या संदर्भात दिनांक ८/६/२०१५ रोजी झालेल्या इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती सदस्यांच्या बैठकीत झालेल्या ठरावानुसार सदर अल्पसंख्यांक, इनहाऊस तसेच व्यवस्थापन कोटयातील प्रवेशाची प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार त्यासाठी पथक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार आपली सदर पथकावर विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. आपण वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देवून कनिष्ठ महाविद्यालयांनी दिलेल्या प्रवेशांबातचा सविस्तर अहवाल समिती कडे सादर करावा. कोणत्याही परिस्थिती तक्रार होणार नाही दक्षता घ्यावी.

(रामचंद्र जाधव)
अध्यक्ष,
इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती, पुणे
तथा
शिक्षण उपसंचालक,